Controller of Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI ✆ TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 23-Jun-14 3:50:30 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,

विषय :- महाविद्यालयांमधील नवीन नोंदणीसाठी फॉर्म उपलब्ध झाल्याबाबत...

महोदय,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, महाविद्यालयांमधील नवीन (unregistered regular students) नोंदणी अर्ज http://suk.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर ONLINE APPLICATION FOR ADMISSION ACADEMIC YEAR 2014-15 या लिंकमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी आपापले नोंदणी अर्ज वरील संकेतस्थळावरून भरावेत अशी सूचना सर्व संबंधितांसाठी सूचना फलकावर लावण्यात यावी.

नोंदणी करताना निवडलेले विषयच पुढे प्रणालीद्वारा परीक्षा अर्जावर येतात त्यामुळे नोंदणीवेळी निवडलेले विषय विद्यार्थ्यांनी प्रथम सत्र समाप्तीपूर्वी बदलले असतील तर त्याबाबतची दुरूस्ती महाविद्यालयाच्या लॉगीनमधून संबंधित लिपिकानी परीक्षा अर्ज पाठविण्यापूर्वी करून घ्यावयाची आहे. नोंदणीवेळीचा विषय नंतर बदलला असेल व त्याबाबतची दुरूस्ती पोर्टलवर वेळेत केलेली नसेल तर अशा विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज नोंदणीवेळच्या विषयांचाच जनरेट होतो, तसेच त्याचे हॉलतिकीटही त्याच विषयाचे जनरेट होते. त्यामुळे निकालावेळी अनेक प्रकारच्या अडचणी येतात. तरी याबाबतची पूर्तता वेळेत करून घ्यावी. याअनुषंगाने विद्यार्थी, पालक आणि संबंधित विषय शिक्षक यांनाही सूचना देण्यात यावी. कारण विषयबदलांच्या आवश्यक बाबींची वेळेत पूर्तता न केल्यामुळे पुढे अशा विद्यार्थ्यांच्या निकालास विलंब होतो. तरी याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्याबाबत सूचना द्याव्यात ही विनंती.

प्रथम व द्वितीय वर्षांचे निकाल जाहीर करण्याचे काम सुरू आहे. **निकालानंतर** अशा विद्यार्थ्यांचे (registered regular students) पुढील वर्गाचे प्रवेश अर्ज वरील संकेतस्थळावर उपलब्ध होतील. तसेच दूरशिक्षण अभ्यासक्रमांचे सर्व प्रकारचे प्रवेश अर्ज **दिनांक २६ जून २०१४** पासून उपलब्ध होतील. वरील सूचना दूरशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांसह सर्वांना लागू राहतील याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-

(श्रीमती ए.ए. महाडेश्वर)
उपकुलसचिव

प्रत :- विभागप्रमुख व सहाय्यक कुलसचिव व उपकुलसचिव सर्व परीक्षा विभाग
दूरशिक्षण विभाग, पात्रता विभाग, जनसंपर्क अधिकारी यांना माहितीसाठी

F:\navin file COE.doc/mahadeshwar/